## चिन्मय मिशन फोंडा
### मनाचे श्लोक पाठांतर स्पर्धा २३ फेब्रु. २०२०

**श्री रामदासस्वामिंचे श्री मनाचे श्लोक**

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा ।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ॥
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा ।
गमू पंथ आनंत या राघवाचा ॥ १ ॥

मना सज्जना भक्तिपंथेची जावे ।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ॥
जनीं निंद्य ते सर्व सोडूनी द्यावे ।
जनीं वंद्य ते सर्व भावें करावे ॥ २॥

प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।
पुढे वैखरी राम आधी वदावा ॥
सदाचार हा थोर सोडू नये तो ।
जनीं तोचि तो मानवी धन्य होतो ॥३॥

मना वासना दुष्ट कामा न ये रे ।
मना सर्वथा पापबुद्धी नको रे ॥
मना सर्वथा नीति सोडूं नको हो ।
मना अंतरी सार वीचार राहो ॥४ ॥

मना पापसंकल्प सोडूनि द्यावा ।
मना सत्य संकल्प जीवीं धरावा ॥
मना कल्पना ते नको वीषयांची ।
विकारे घडे हो जनीं सर्व ची ची ॥५ ॥

नको रे मना क्रोध हा खेदकारी ।
नको रे मना काम नाना विकारी ॥
नको रे मना सर्वदा अंगिकारू ।
नको रे मना मत्सरू दंभ भारू ॥६॥

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावे ।
मना बोलणे नीच सोशीत जावे ॥
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावे ।
मना सर्व लोकांसि रे नीववावे ॥ ७ ॥

देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥
मना चंदनाचे परी त्वां झिजावे ।
परी अंतरी सज्जना नीववावे ॥ ८॥

नको रे मना द्रव्य तें पूढिलांचे ।
अति स्वार्थबुद्धी न रे पाप सांचे ॥
घडे भोगणे पाप ते कर्म खोटें ।
न होतां मनासारखें दुःख मोठें ॥९ ॥

सदा सर्वदा प्रीति रामीं धरावी ।
दुखाची स्वयें सांडि जीवीं करावी ॥
देहेदुःख तें सूख मानीत जावें ।
विवेके सदा सस्वरूपीं भरावें ॥ १० ॥

जनीं सर्वसूखी असा कोण आहे ।
विचारे मना तूचि शोधूनि पाहें ॥
मना त्वांचि रे पूर्वसंचीत केले ।
तयासारिखे भोगणे प्राप्त झालें ॥११॥

मना मानसीं दुःख आणू नको रे ।
मना सर्वथा शोक चिंता नको रे ॥
विवेके देहेबुद्धी सोडूनि द्यावी ।
विदेहीपणें मुक्ती भोगीत जावी ॥१२॥

मना सांग पां रावणा काय जालें ।
अकस्मात ते राज्य सर्वै बुडालें ॥
म्हणोनी कुडी वासना सांडिं वेगीं ।
बळें लागला काळ हा पाठिलागीं ॥१३॥

जिवा कर्मयोगे जनीं जन्म जाला ।
परी शेवटीं काळमूखीं निमाला ॥
महाथोर ते मृत्युपंथेचि गेले ।
कितीएक ते जन्मले आणि मेले ॥१४ ॥

मना पाहतां सत्य हे मृत्युभूमी ।
जितां बोलती सर्वही जीव मी मी ॥
चिरंजीव हे सर्वही मानिताती ।
अकस्मात सांडूनियां सर्व जाती ॥१५॥

मरे एक त्याचा दुजा शोक वाहे ।
अकस्मात तोही पुढें जात आहे ॥
पुरेना जनीं लोभ रे क्षोभ त्यातें ।
म्हणोनी जनीं मागुता जन्म घेतें ॥१६॥

मनी मानवा व्यर्थ चिंता वहातें ।
अकस्मात होणार होऊन जातें ॥
घडे भोगणें सर्वही कर्मयोगे ।
मतीमंद ते खेद मानी वियोगें ॥१७ ॥

मना राघवेंवीण आशा नको रे ।
मना मानवाची नको कीर्ति तूं रे ॥
जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें ।
तया वर्णितां सर्वही श्लाघ्यवाणें ॥१८॥

मना सर्वथा सत्य सांडूं नको रे ।
मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे ॥
मना सत्य तें सत्य वाचे वदावें ।
मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावे ॥१९॥

बहू हिंपुटी होईजे मायपोटीं ।
नको रे मना यातना तेचि मोठी ॥
निरोधें पचे कोंडिलें गर्भवासी ।
अधोमूख रे दुःख त्या बाळकासी ॥२०॥

मना वासना चूकवी येरझारा ।
मना कामना सांडिं रे द्रव्यदारा ॥
मना यातना थोर हे गर्भवासीं ।
मना सज्जना भेटवी राघवासी ॥२१ ॥

मना सज्जना हीत माझे करावें ।
रघूनायका दृढ चित्ती धरावें ॥
महाराज तो स्वामि वायूसुताचा ।
जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा ॥२२॥

न बोले मना राघवेवीण काही ।
मनी वाउगे बोलता सूख नाही ॥
घडीनें घडी काळ आयुष्य नेतो ।
देहांतीं तुला कोण सोडूं पहातो ॥२३॥

रघूनायकावीण वायां शिणावें ।
जनासारिखें व्यर्थ का वोसणावें ॥
सदा सर्वदा नाम वाचे वसों दे ।
अहंता मनी पापिणी ते नसों दे ॥२४॥

मना वीट मानू नको बोलण्याचा ।
पुढें मागुता राम जोडेल कैंचा ॥
सुखाची घडी लोटतां सूख आहे ।
पुढें सर्व जाईल कांहीं न राहे ॥२५ ॥

देहेरक्षणाकारणें यत्न केला ।
परी शेवटीं काळ घेऊन गेला ॥
करीं रे मना भक्ति या राघवाची ।
पुढें अंतरी सोडिं चिंता भवाची ॥२६॥

भवाच्या भयें काय भीतोस लंडी ।
धरी रे मना धीर धाकासि सांडी ॥
रघूनायकासारिखा स्वामि शीरीं ।
नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ॥२७॥

दिनानाथ हा राम कोदंडधारी ।
पुढें देखतां काळ पोटीं थरारी ॥
मना वाक्य नेमस्त हें सत्य मानीं ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥२८॥

पदी राघवाचे सदा ब्रीद गाजे ।
बळें भक्तरीपूशिरीं कांबि वाजे ॥
पुरी वाहिली सर्व जेणें विमांनीं ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥२९॥

समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।
असा सर्व भूमंडळी कोण आहे ॥
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३०॥

महासंकटी सोडिले देव जेणें ।
प्रतापें बळें आगळा सर्वगूणें ॥
जयातें स्मरे शैलजा शूलपाणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३१॥

अहल्या शिळा राघवें मुक्त केली ।
पदीं लागतां दिव्य होऊनि गेली ॥
जया वर्णितां शीणली वेदवाणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३२॥

वसे मेरुमांदार हे सृष्टिलीळा ।
शशी सूर्य तारांगणे मेघमाळा ॥
चिरंजीव केले जनीं दास दोन्ही ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३३॥

उपेक्षा कदा रामरूपीं असेना ।
जिवां मानवां निश्चयो तो वसेना ॥
शिरीं भार वाहेन बोले पुराणीं ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३४॥

असे हो जया अंतरीं भाव जैसा ।
वसे हो तया अंतरीं देव तैसा ॥
अनन्यासि रक्षीतसे चापपाणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३५॥

सदा सर्वदा देव सन्नीध आहे ।
कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ॥
सुखानंद –आनंद- कैवल्यदानी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३६॥

सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा ।
उडी घालितो संकटीं स्वामि तैसा ॥
हरीभक्तिचा घाव गाजे निशाणीं ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३७॥

मना प्रार्थना तूजला एक आहे ।
रघूनाथ थक्कीत होऊनि पाहे ॥
अवज्ञा कदा हो यदर्थी न कीजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥३८॥

जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें ।
जयाचेनि योगें समाधान बाणे ॥

तयालागिं हे सर्व चांचल्य दीजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥३९॥

मना पाविजे सर्वही सूख जेथें ।
अती आदरें ठेविंजे लक्ष तेथें ॥
विवेकें कुडी कल्पना पालटींजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥४०॥

बहू हिंडता सौख्य होणार नाहीं ।
शिणावें परी नातुडे हीत कांहीं ॥
विचारें बरें अंतरा बोधवींजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥४१॥

बहूतांपरी हेंचि आतां धरावें ।
रघूनायका आपुलेंसें करावें ॥
दिनानाथ हें तोडरीं ब्रीद गाजे ।
मना सज्जना राघवी वस्ति कीजे ॥४२॥

मना सज्जना एक जीवीं धरावे ।
जनीं आपुलें हीत तूवां करावें ॥
रघूनायकावीण बोलों नको हो ।
सदा मानसीं तो निजध्यास राहो ॥४३॥

मना रे जनीं मौनमुद्रा धरावी ।
कथा आदरें राघवाची करावी ॥
नसे रामे ते धाम सोडूनि द्यावें ।
सुखालागिं आरण्य सेवीत जावें ॥४४॥

जयाचेनि संगें समाधान भंगे ।
अहंता अकस्मात येउनि लागे ॥
तये संगतीची जनीं कोण गोडी ।
जिये संगतीनें मती राम सोडी ॥४५॥

मना जे घडी राघवेंवीण गेली ।
जनीं आपुली ते तुवां हानि केली ॥
रघूनायकावीण तो शीण आहे ।
जनीं दक्ष तो लक्ष लावूनि पाहे ॥४६॥

मनीं लोचनी श्रीहरी तोचि पाहे ।
जनीं जाणता भक्त होऊनि राहे ॥
गुणीं प्रीति राखे क्रमूं साधनाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥४७॥

सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा ।
सदा रामनामें वदे नित्य वाचा ॥
स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥४८॥

सदा बोलण्यासारिखें चालताहे ।
अनेकीं सदा एक देवासि पाहे ॥
सगूणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥४९॥

नसे अंतरी काम नानाविकारी ।
उदासीन जो तापसी ब्रह्मचारी ॥
निवाला मनीं लेश नाहीं तमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥५०॥

जय जय रघुवीर समर्थ